वाचले – 1. प्रादेशिक हवामान अंदाज केंद्र, मुंबई यांचेकडील संदेश दि. 04/08/2019.
2.शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण 2019/प्र.क्र.199/एसडी/2/दि. 2/8/2019.

---

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
सातारा

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्र./नै.आ./कावी/ 1228 /2019
सातारा दि. 04 /08/2019

**विषय – जिल्हयातील आपत्कालीन परिस्थिती व स्थानिक परिस्थितीचा आढावा घेऊन शाळांना सुटटी जाहीर करणेबाबत .**

**आदेश**

ज्याअर्थी , प्रादेशिक हवामान अंदाज केंद्र,मुंबई यांचेकडील संदेश दि. 04/08/2019 अन्वये दि. 04/08/2019 ते दि. 06/08/2019 या कालावधीत गोवा व महाराष्ट्र राज्याच्या किनारपटटीवर वारे ताशी 40 ते 60 कि.मी.ने वाहणार असलेचे कळविले आहे. सदर तिन्ही दिवसात अतिवष्टीचा इशारा दिला असलेने, सातारा जिल्हयातील महाबळेश्वर, पाटण, जावली, वाई, सातारा , व कराड या तालुक्यामध्ये दि. 02/08/2019 पासून अतिवष्टीस सुरुवात झालेली आहे.

ज्याअर्थी , सातारा जिल्हयात झालेली व होणारी अतिवष्टी पाहता सदर अतिवष्टीमुळे जिल्हयात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवष्टीमुळे आपत्तकालीन परिस्थितीती निर्माण झाली असलेने त्याचा परिणाम शालेय विदयार्थी यांचेवर होऊ नये या करिता सातारा जिल्हयातील माण ( दहिवडी )तालुका वगळून उर्वरित सर्व तालुक्यातील शाळांना दि. 05/08/2019 रोजी सुटटी घोषीत करणे आवश्यक आहे .

त्याअर्थी , मी श्वेता सिंघल, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यस्थापन प्राधिकरण सातारा , मला शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील वाचले क्र. 02 नुसार सदर परिपत्रकातील परिच्छेद क्र. 02 मधील शासनाने प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, **सातारा जिल्हयातील माण ( दहिवडी )तालुका वगळून उर्वरित सर्व तालुक्यातील सर्व शाळांना (प्राथमिक , माध्यमिक , उच्च माध्यमिक व महाविदयालये) बुधवार दि. 07/08/2019** रोजी सुटटी जाहिर करीत आहे.

जिल्हाधिकारी
जिल्हा सातारा

(श्वेता सिंघल)
जिल्हाधिकारी सातारा तथा
अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यस्थापन
प्राधिकरण सातारा

प्रत – 1. मा.विभागीय आयुक्तसो, पुणे विभाग पुणे यांना माहितीसाठी सविनय सादर.
2.मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद सातारा यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी
3.पोलीस अधिक्षक, सातारा यांना माहितीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी
4.उपविभागीय अधिकारी – (सर्व )यांना माहितीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी
5.शिक्षण अधिकारी माध्यमिक / प्राथमिक यांना आवश्यकत्या कार्यवाहीसाठी
6. तहसिलदार ... (सर्व) यांना माहितीसाठी व आवश्यकत्या कार्यवाहीसाठी
7. जिल्हा प्रशासकीय अधिकारी,न.पा.शाखा,जिल्हाधिकारी कार्यालय सातारा यांना कार्यवाहीसाठी
8. जिल्हा माहिती अधिकारी , सातारा यांना माहिती व तात्काळ प्रसिध्दीसाठी रवाना.